# प्रसनोट

दिनांक– ०२/११/२०१८.

## ठाणे जिल्हा को.ऑप.हौ. फेडरेशन येथील विशेष वसुली व करविक्री अधिकारी यांना लाच स्विकारताना अटक

दिनांक ०२/११/२०१८ रोजी, ठाणे जिल्हा को.ऑप.हौ. फेडरेशन येथील विशेष वसुली व कर विक्री अधिकारी नितीन तुकाराम बने यांना यातील तक्रारदार यांच्याकडून २०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीप्रमाणे

यातील तक्रारदार यांच्या बहिणीच्या कल्याण येथील गाळयाची जप्तीची कारवाई थांबविण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ॲसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक नितीन तुकाराम बने यांना तक्रारदार यांचेकडून २,०००/– रुपयांची लाच स्विकारताना त्यांच्या कार्यालयाबाहेरील रोडवर रंगेहात पकडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती सीमा आडनाईक, पोलीस निरीक्षक ॲसीबी ठाणे हया करत आहेत.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner